जिजामाता बहुऊद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ पाटोदा (बु)
# संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट
## (मत्स्यशात्र विभाग)
सलंग्न: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
ई-मेल: headfisheryskm@gmail.com वेब: skmjalkot.org फोने न. 02385 - 276130

Sambhajirao Kendre Mahavidyalaya JALKOT

### एक दिवसीय प्रशिक्षण 'गोड्यपाण्यातील आधुनिक मत्स्य संवर्धन' या विषयावर
शुक्रवार दिनांक 30 ऑगस्ट 2024

## अहवाल

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट (मत्स्यशास्त्र विभाग) व महाराष्ट्र शासन, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'गोड्या पाण्यातील आधुनिक मत्स्य संवर्धन' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. जळकोट, अहमदपूर, चाकुर, उदगीर, लातूर मुखेड, जांब (बु.) येथील मत्स्य शेतकरी, प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना चे लाभार्थी, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था यांचे चेअरमन, सदस्य, मत्स्यशास्त्र विभागातील विद्यार्थी यांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला. एकूण ७० प्रशिक्षणार्थी यांनी सहभाग घेतला.

या एक दिवशीय मत्स्य प्रशिक्षण कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. बी टी लहाने, उद्धाटक तथा मार्गदर्शक म्हणून माननीय श्रीमती तेजस्विनी करळे, सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, लातूर व तसेच प्रमुख उपस्थित श्री अमोल मुसने, मत्स्य विकास अधिकारी, जळकोट येथे एक दिवशीय मत्स्य प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्धाटक म्हणुन बोलताना म्हणाल्या शासनाच्या विविध योजनेची विस्तृत माहिती देऊन जनतेनी जास्तीत -जास्त योजनाचा लाभ घेऊन आपले जीवन समृध्द करावे. व यापुढेही आपण वेगवेगळ्या विषयावर प्रशिक्षण संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट यांच्या संयुक्त विद्यमानाने घेणार आहोत असेही बोलले. या कार्यशाळेत मान्यवरानी उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करून आधुनिक मत्स्यसंपदे विजयी जनजागृती करण्याचे आवाहान केले .

या कार्यशाळेत तांत्रिक सत्र डॉ. शरद सुरनर यांनी पिंजरा पद्धतीमध्ये मत्स्यपालन या विषयावर घेतले. या मध्ये पिंजरा पद्धतीत मत्स्यपालन कसे करायचे, या पद्धतीमध्ये कोणकोणत्या जातीचे मासे पालन केली जाऊ शकतात, माशांना आपण कोणत्या प्रकारचे व गुणवत्ता युक्त खाद्य तयार करून कसे खाद्य द्यायचे व पिंजरा पद्धत मत्स्यपालनाचे फायदे याबद्दल माहिती दिली व तसेच श्री वडजे बी.एस यांनी पाण्याची मापक व गुणवत्ता तपासणी बाबत अवगत केले. तसेच श्री अमोल मुसने त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनेबद्दल व योजनेचा लाभ कसा घ्यायचा व त्याला शासनाकडून अनुदान कसे मिळवायचे व तसेच राष्ट्रीयकृत बँकेकडून मत्स्य पालन या व्यवसायाला कर्ज कसे मिळवायचे याबद्दल सविस्तर माहिती दिली.

एकदिवसीय कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व सहकारी व मत्स्यशास्त्र विभागाच्या विध्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यकृमाचे सुत्रसंचालन डॉ.मनीषा देशपांडे तर आभार प्रा सौ आरती सुरपाम यांनी केले.

धन्यवाद

| संयोजक | अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक | प्राचार्य |
| --- | --- | --- |
| HEAD<br>Dept.of Fishery Science<br>Sambhajirao Kendre Mahavidyalaya<br>Jalkot,Tq.Jalkot Dist.Latur | Co -Ordinator<br>IQAC<br>Sambhajirao Kendre College<br>Jalkot Dist.Latur | डॉ.बी.टी.लहाने<br>प्राचार्य<br>संभाजीराव केंद्रे महाविद्यालय<br>जळकोट जि.लातूर |



Scanned with ACE Scanner